निवीदा अर्ज किंमत रू. १०००/-

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.


५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


**दरपत्रक क्र. के - १४/ भांडार / लोखंडी ट्रंक दुरुस्ती / २०२५-२०२६ / 3126**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६ ००४ या कार्यालयामार्फत सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षाकरिता परिशिष्ट - अ- मध्ये नमूद अटी व शर्तीनुसार तसेच परिशिष्ट - ब- मध्ये दर्शविलेल्या तपशीलाप्रमाणे लोखंडी ट्रंक दुरुस्ती करणेसाठी दिनांक 03/09/२०२५ ते 12/09/२०२५ या कालावधीत सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दिनांक 12/09/२०२५ रोजी दुपारी ४.०० नंतर प्राप्त होणारी दरपत्रके कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. लोखंडी ट्रंक दुरुस्ती करणेसाठीच्या कामाचे अंदाजित निविदा मूल्य (Estimated Cost) रु. २,००,०००/- ( रुपये दोन लाख फक्त ) आहे.

निविदेसाठी अ लिफाफा (तांत्रिक कागदपत्रे) व ब लिफाफा (दरपत्रक) पध्दत आहे.

**अ लिफाफ्यात सादर करावयाची कागदपत्रे**

१. मुंबई दुकान व संस्था अधिनियम १९४८ अन्वये अद्ययावत व्यवसाय नोंदणी परवान्याची साक्षांकित प्रत.
२. सन २०२४-२०२५ चे आयकर भरणा विवरण पत्र / पोहोच (Returns/Acknowledgement) व पॅन कार्डची झेरॉक्स प्रत.
३. निविदाधारकास उपरोक्त / तत्सम कामाचा शासकीय / निमशासकीय वा खाजगी संस्थेचे काम केल्याचा अनुभव असल्यास प्रमाणपत्राची प्रत.
४. बयाणा रक्कम रु. ६,०००/- (रुपये सहा हजार) राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६ ००४ यांचे नावे.

**ब लिफाफ्यात सादर करावयाची कागदपत्रे**

१. मंडळाचे अधिकृत दरपत्रक.

**निविदा अटी व शर्ती**

१. दरपत्रकातील अटी व शर्तीप्रमाणे अ लिफाफा (तांत्रिका) मधील माहिती परिपूर्ण व निकषानुसार असल्याशिवाय लिफाफा ब (दरपत्रक) उघडला जाणार नाही.
२. कमी रक्कमेची अथवा जादा रक्कमेची दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे हे अधिकार मंडळाच्या सक्षम समितीस राहतील. याबाबत कोणत्याही प्रकारची कारणे किंवा स्पष्टीकरण देण्यात येणार नाही.

कृ.मा.प.

३. अटी असलेल्या किंवा संदिग्ध दरपत्रक विचारात घेतल्या जाणार नाहीत. अमान्य दरपत्रकधारकाची बयाणा रक्कम निविदासंबंधीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर आपले मागणी पत्र सादर केल्यानंतर परत करण्यात येईल. दरपत्रकेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे प्राप्त दरपत्रकापैकी एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क मंडळाने राखून ठेवलेला आहे.

४. लघुउद्योजक म्हणून नोंदणी केलेल्या अथवा रजिस्टर्ड सोसायटी, सेवा सहकारी संस्था अशा दरपत्रकधारकांना बयाणा रक्कम/ अनामत भरण्यापासून सूट मिळणार नाही. तसेच मंडळाकडे जमा असलेली वा अन्य निविदेसाठी भरलेली बयाणा रक्कम प्रस्तुत निविदेसाठी ग्राहय मानली जाणार नाही.

५. दिलेला दर सर्व करांसह असणे आवश्यक आहे.

६. सदर दरपत्रके उघडण्याची तारीख दरपत्रकधारकांना दूरध्वनीद्वारे कळविण्यात येईल.

७. मान्य दरपत्रकधारकास मंडळाच्या नमुन्यातील करारनामा रुपये ५००/- च्या स्टॅम्पपेपरवर स्वखर्चाने सात (७) दिवसाच्या आत करून द्यावा लागेल.

८. मान्य दरपत्रकदारास रु. १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) इतकी रक्कम सुरक्षा ठेव ( सिक्युरिटी डिपॉझिट) स्वरूपात मंडळाकडे धनाकर्षाद्वारे करार कालावधीकरिता जमा करावी लागेल. सदर रक्कमेवर कोणतेही व्याज वा लाभांश मंडळाकडून देय असणार नाही. दरपत्रक करार संपलेनंतर तसेच पुढील दरपत्रकाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सुरक्षा ठेवीची मागणी केल्यानंतर ती विनाव्याज परत केली जाईल. सोपविलेले काम असमाधानकारक असलेस सुरक्षा ठेव जप्त करण्याचा अधिकार मंडळ कार्यालयास राहील.

९. मान्य दरपत्रकधारकाने सुरक्षा ठेव जमा केल्यानंतर व करारनामा स्वाक्षरी नंतर पुरवठा आदेश / कार्यादेश देण्यात येईल.

१०. कराराच्या कालावधी दरम्यान उपरोक्त संदर्भात जर काही वाद / तंटा उद्‌भवल्यास तो फक्त कोल्हापूर येथील कोर्टाच्या कार्यकक्षेतच चालेल.

११. दरपत्रक प्रक्रिया पूर्ण होताच अमान्य दरपत्रकधारकांच्या लेखी मागणीनंतर बयाणा / ई.एम.डी. रक्कम बिनव्याजी परत केली जाईल.

१२. दरपत्रकेतील मान्य दर एका वर्षासाठी करार केल्यापासून बंधनकारक राहतील. मान्य दर सर्व करांसहित (GST व इतर) राहतील. करारा दरम्यान वाढीव दर वा अन्य कर अनुज्ञेय असणार नाहीत.

१३. लोखंडी ट्रंका दुरुस्तीचे आदेश दिल्यापासून ३० दिवसाच्या आत सर्व ट्रंका दुरुस्त करून द्यावयाच्या आहेत. मुदतीमध्ये ट्रंकाची दुरुस्ती न झाल्यास, प्रतिदिनी रुपये ५०/- विलंब दंड आकारण्यात येईल.सदर ट्रंका दुरुस्तीचे काम समाधानकारक नसल्यास काम कोणत्याही क्षणी काढून घेण्याचे अधिकार मंडळास राहतील.

१४. मान्य केलेल्या दरामध्ये कोणत्याच प्रकारची वाढ करुन दिली जाणार नाही.

१५. कार्यालयाने मान्य केलेल्या नमुन्याप्रमाणेच साहित्य दुरुस्तीसाठी वापरावयाचे आहे. ट्रंका दुरुस्तीचे काम हे या कार्यालयात उपस्थित राहूनच करावयाचे आहे. केलेले काम मजबूत असणे आवश्यक आहे.

१६. ज्या ट्रंकाची दुरुस्ती करावयाची आहे, त्या ट्रंका प्रथम वेगळया काढून घ्याव्यात व ट्रंकाची दुरुस्ती झाल्यानंतर त्या ट्रंका बाजूला ठेवाव्यात. ज्या ट्रंकाची दुरुस्ती केली असेल, त्या ट्रंकाना व साहित्यास विशिष्ट प्रकारची खूण करावी. याबाबत भांडार शाखेकडून योग्य त्या सूचना घ्याव्यात.

१७. दुरुस्ती केलेल्या ट्रंकाचे नंबर्स लिहून त्यासमोर दुरुस्ती दर्शवावी. संपूर्ण ट्रंकाची दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर ट्रंकाची तपासणी करून घेण्यात येईल. त्यानंतरच देयक अदा करण्यात येईल. देयक दोन प्रतीत कार्यालयास सादर करावे लागेल.

१८. देयकातून आयकर विभागाच्या १९४ सी कलमानुसार २ % आयकर (TDS) कपात करण्यात येईल.

१९. देयकातून शासन आदेशानुसार २ % GST कपात करण्यात येईल.

२०. दरपत्रकामध्ये खाडाखोड दिसून आल्यास अशी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

२१. दरपत्रक उघडल्यानंतर न्यूनतम दरपत्रकधारकाने (L१) दरपत्रक प्रक्रियेतून माघार घेतल्यास सदर दरपत्रकधारकांची बयाणा रक्कम जप्त करणे / दंड वसूल करणे / काळया यादीमध्ये टाकणे याबाबतचे अधिकार विभागीय मंडळास राहतील.

२२. आवश्यकतेनुसार कराराची मुदत वाढविणे अथवा कमी करणेचे अधिकार विभागीय मंडळास राहतील. जर करारास मुदतवाढ दिली तर वाढीव कालावधीत पूर्वीच्याच दराने काम पूर्ण करून दयावे.

स्थळ :- कोल्हापूर
दिनांक :- 03/09/2025

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६ ००४.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४

दरपत्रक क्र.के - १४ / भांडार/ लोखंडी ट्रंका दुरुस्ती / २०२५-२०२६/

|| परिशिष्ट ` ब ` ||

१. दरपत्रक धारकाचे नाव व संपूर्ण पत्ता : ------------------------------------------
------------------------------------------

फोन / मोबाईल नंबर ------------------------------------------

२. अनामत रक्कम भरल्याचा तपशील :-
पावती क्रमांक / डी.डी.क्रमांक --------------------------- दिनांक--------------------
बँकेचे नांव :- ----------------------------------------------------------------

३. नमुने जोडले आहेत काय ? होय / नाही ------------------------------------------

| अ.क्र. | तपशील | एक नगाचा दर रुपये (साहित्य, मजूरी व सर्व करांसह ) |
|---|---|---|
| १ | एक कोपरा | रुपये |
| २ | एक कडी | रुपये |
| ३ | साईडची एक कडी | रुपये |
| ४ | मधली कडी | रुपये |
| ५ | एक कोयंडा | रुपये |
| ६ | ट्रंकाची किरकोळ दुरुस्ती | रुपये |
| ७ | ट्रंकेवर नांव व नंबर घालणे ( इंग्रजी व मराठीमध्ये) प्रती ट्रंक | रुपये |

परिशिष्ट ` अ ` मधील अटी व शर्ती मी वाचल्या असून, त्या माझ्यावर बंधनकारक राहतील.

दिनांक :-
स्थळ :-

दरपत्रकधारकाची सही व शिक्का
( रबरी शिक्कयासह )